RISHI TECHTEX LIMITED
Registered Office : 612, Veena Killedar Industrial Estate, 10-14, Pais Street, Byculla (W), Mumbai - 400 011.
Tel. No. : 022-23075677, 23074897 Fax : 91 (22) 23080022 E-mail : info@rishitechtex.com
Website : www.rishitechtex.com CIN - L28129MH1984PLC032008

Date: 25.11.2025

To,
The Manager - Listing
BSE Ltd.
25th Floor, P.J. Towers,
Dalal Street,
Mumbai – 400 001.

Scrip Code : 523021
ISIN: INE989D01010

**Sub.: Opening of Special Window for Re-lodgement of Transfer Requests of Physical Shares**

Dear Sir/Madam,

Further to our newspaper advertisement dated 31st July, 2025, and as a part of ongoing communications, shareholders of the Company are again informed that in order to facilitate ease of investing for investors and to secure the rights of investors in the securities which were purchased by them, SEBI vide circular SEBI/HO/MIRSD/MIRSD-PoD/P/CIR/2025/97 dated 02nd July, 2025 has opened a special window only for re-lodgement of transfer deeds, which were lodged prior to the deadline of 01st April, 2019 and rejected/returned /not attended to due to deficiency in the documents /process/or otherwise for a period of six months from 07th July, 2025 till 06th January, 2026 .

Accordingly, in compliance with Regulation 30 read with Part A of Schedule III of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, as amended from time to time, please find enclosed a copy of the advertisement regarding opening of Special Window for Re-lodgement of Transfer Requests of Physical Shares, published in Business Standard (English) and Navakal (regional -Marathi) newspapers today, i.e. on Tuesday, 25th November, 2025.

This is for your information and records.

Thanking you,

Yours truly,

For Rishi Techtex Limited

Gauri Sanjay Gangal

Digitally signed by Gauri Sanjay Gangal
Date: 2025.11.25 16:28:22 +05'30'

Gauri Gangal
Company Secretary

Encl: As above.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# एआय तंत्रज्ञान वरदान आणि आव्हान

**सध्या** जगभर आर्टिफिशिअल इंटिलिजन्स म्हणजेच एआय तंत्रज्ञानाचा एकाअर्थी धुमाकुळच सुरू झालेला आहे. एकीकडे या एआय तंत्रज्ञानाविषयी आकर्षण आणि त्याच्यापासून होणारे नुकसान याविषयीसुद्धा जगभर जोरदार चर्चा सुरू आहे. जगातल्या सर्वच क्षेत्रांना हे एआय तंत्रज्ञान वरदान ठरेल, असा सर्वांचाच अंदाज आहे. मात्र प्रत्यक्षात हे तंत्रज्ञान हाताळण्यासाठी त्या पद्धतीचे कुशल तंत्रज्ञ मिळणे सर्वात कठीण झालेले आहे. भारतासारख्या देशात एआय तंत्रज्ञानाची प्रगती सांगितली जात असताना त्यापासून निर्माण होणाऱ्या संकटांची भीतीदेखील व्यक्त होते आहे. प्रामुख्याने एआयच्या प्रकारामुळे मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी निर्माण होईल. सध्याच्या कंपन्यांमधून मोठ्या संख्येने कामगार कपात होईल. जे एआय तंत्रज्ञान म्हणजे एक चमत्कार किंवा आश्चर्य असल्याचे सांगितले जाते, त्यापासून निर्माण होणाऱ्या वेगवेगळ्या परिणामांचादेखील तितक्याच गांभीर्याने विचार करणे भाग पडते आहे. भारतातील प्रसिद्ध उद्योजक आनंद महिंद्र यांनी अलिकडेच अतिशय महत्त्वाचे विधान केले. ते म्हणतात की, एआय तंत्रज्ञानाच्या अन्य तोट्यांपेक्षा त्याचा यशस्वीपणे उपयोग करणारा तितका कुशल तंत्रज्ञ उपलब्ध होत नाही. ज्या वेगाने एआयचा प्रसार होतो आहे किंवा त्याची उपयुक्तता सिद्ध होणार आहे त्या तुलनेत या सगळ्या वेगवान कार्यपद्धतीला अंमलात आणणारा प्रशिक्षित कर्मचारी वर्ग उपलब्ध न होणे हे आज जगापुढचे सर्वात मोठे संकट ठरते. अनेक ठिकाणी हे तंत्रज्ञान शिकवण्याची व्यवस्था जरी झाली असली तरी ते आत्मसात करून तितक्या प्रभावीपणे अंमलात आणणारा तंत्रज्ञ कर्मचारी वर्ग उपलब्ध होत नसल्याचे महिंद्र यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. त्यांनी या महत्त्वाच्या विषयाकडे शिक्षण आणि उद्योग जगताचे लक्ष वेधून सरकारलादेखील जागे करण्याचा प्रयत्न केला आहे. एकाअर्थी त्यांचे हे मत मोठा इशारा ठरतो.

**कामगार कपात , भीती आणि वस्तुस्थिती**

जगातल्या टेस्ला कंपनीचे प्रमुख एलन मस्क यांनीसुद्धा ही भीती बोलून दाखवलेली आहे. अमेरिकेत एआयचा दबदबा आहे. आणि एलन मस्क यांच्या कंपनीचा नवनवीन शोध लावण्याचा सुसाट प्रवास सुरू आहे. त्यांनी अलिकडेच ऑप्टीमस नावाचा रोबोट तयार केला असून, हा रोबोट म्हणजे एआयचा आणखीनच मोठा चमत्कार ठरतो. अनेक प्रकारची घरगुती आणि कार्यालयीन कामेसुद्धा करतो. अगदी स्वतःचे चार्जिंग संपले तरी तो स्वतः जाऊन रिचार्ज करून घेण्याचेही काम करतो. अशा प्रकारचा रोबोट जर घाऊक पद्धतीने उपलब्ध झाला तर अक्षरशः शेकडो प्रकारची कामे रोबोट करेल आणि सामान्य माणसाला कोणतेच काम उरणार नाही. यातूनच बेरोजगारीची भीतीदेखील व्यक्त होते आहे. परंतु अशा प्रकारच्या रोबोटना हाताळण्यासाठी किंवा त्यांच्या निर्मितीसाठीसुद्धा तशा प्रकारचा पूर्ण प्रशिक्षित किंवा एआय तंत्रज्ञानाची प्रचंड माहिती असलेला कर्मचारी वर्ग खूप गरजेचा ठरतो. आज तो हव्या तेवढ्या प्रमाणात उपलब्ध होत नाही. याचा अर्थ आनंद महिंद्रा म्हणतात त्याप्रमाणे एआयचा वापर हा अनिवार्यच ठरणार आहे. म्हणजे आज ज्या पद्धतीने मोबाईसारखी वस्तू प्रत्येकासाठी अनिवार्य ठरली आहे. एआयने निर्माण केलेल्या अनेक गोष्टी दैनंदिन जीवनाचा आवश्यक भाग ठरणार आहे. म्हणजे एआयशिवाय पुढच्या वीस-पंचवीस वर्षांत कोणताही दुसरा पर्याय शिल्लक राहणार नाही. आज आपण ज्या डिजिटल युगाचे कौतुक करीत आहोत आणि त्यापासून मिळालेल्या अनेक फायद्यांबद्दल समाधान व्यक्त करीत आहोत. त्यापेक्षाही प्रगत किंवा बरेच फायदे असणारे हे एआय तंत्रज्ञान जगभर तंत्रज्ञानाची एक मोठी क्रांती म्हणूनच ओळखले जाईल. याविषयी कुतुहल किंवा आकर्षण असणे हा त्यातला सामान्य भाग झाला. परंतु या तंत्रज्ञानाची यशस्वितता अनुभवणे हा खूप वेगळा भाग ठरतो. एलन मस्कसारख्या तज्ज्ञ माणसाने या तंत्रज्ञानाची केवळ उपयुक्तता सिद्ध केलेली नसून त्याची अनिवार्यता जगाच्या लक्षात आणून दिलेली आहे. एखादे तंत्रज्ञान विकसित होते. त्याच्या विकसित होण्याचा वेग प्रचंड मोठा असतो. त्याच्या यशस्वी अमलबजावणीसाठी वेळ कमी पडतो. आज जगभरातल्या अनेक मोठमोठ्या कंपन्यांनी या तंत्रज्ञानाचा यशस्वीपणे वापर सुरू केलेला आहे. परंतु सामान्य स्तरावर या तंत्रज्ञानाचे परिणाम कसे कसे असू शकतील याचा नेमका अंदाज येत नाही. तसाच अनुभव जगातल्या अनेक देशांना येतो आहे.

**भारताची परिस्थिती**

प्रामुख्याने भारताचा विचार करताना एआय तंत्रज्ञान हे दोन्ही दृष्टींनी एक मोठे आव्हान ठरलेले आहे. सरकारी पातळीवर त्याला प्रोत्साहन देण्याचे सर्व प्रकारचे प्रयत्न होत आहेत. काळाच्या रेट्याचा तो परिणाम ठरतो. परंतु भारतातल्या कंपन्यांची सध्याची परिस्थिती लक्षात घेतली तर मात्र खूप विरोधाभास लक्षात येतो. तो विरोधाभास आनंद महिंद्रा यांनी आपल्या विधानातून दाखवून दिला आहे. आज या क्षेत्रातील प्रसिद्ध कंपन्या एआय तंत्रज्ञान अंमलात आणण्यासाठी प्रचंड उत्सुक आहेत. जागतिक स्तरावर आपले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी त्यांच्यात स्पर्धाही पाहायला मिळते. अशा परिस्थितीत त्यांना आवश्यक असलेल्या तंत्रज्ञ वर्गाची टंचाई तीव्रपणे जाणवते आहे. तंत्रज्ञान समाजाला किंवा त्या त्या देशाला बऱ्याच गोष्टी बदलायला भाग पाडते. मात्र या बदलाला सामोरे जाताना त्याच्या वेगाबरोबर धावणे अशक्य होऊन जाते. आज टेस्ला कंपनीसुद्धा मोठ्या प्रमाणावर संशोधनात आघाडीवर आहे. त्यातून कंपनीला प्रचंड फायदा होतो आहे. आतासुद्धा या नव्या रोबोटची किंमत चाळीस हजार डॉलर्स असल्याचे सांगितले जाते. परंतु हे रोबोट स्वीकारणे किंवा त्याचा इतक्या प्रभावीपणे वापर करण्याची क्षमता अनेक देशांकडे किंवा कंपन्यांकडेसुद्धा नाही. म्हणजे आतापर्यंत एआय तंत्रज्ञान म्हणजे नोकऱ्या गिळणारा महाराक्षस अशी प्रतिमा निर्माण झाली. परंतु योग्य वापर करणारे जर मिळाले तर हे तंत्रज्ञान विकासाचा महादूत ठरू शकतो.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

कष्टातून निर्माण केलेल्या अस्तित्वाचा,
रूबाबच वेगळा असतो.

## पंचांग

**मंगळवार, २५ नोव्हेंबर २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

**मार्गशीर्ष शुक्ल पंचमी**
**नक्षत्र : उत्तराषाढा**

**रवी उदय- ०६-५३**
**रवी अस्त- १७-५८**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ०४-२६ धनु**
**०४-२७ ते २४-०० मकर**

**बुधाचा पहाटे पूर्वेस उदय; नागपूजन-नागदिवे**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### खांडवी



★ **साहित्य :-** बेसन पीठ - १ कप, दही - १ कप, आल्याची पेस्ट - १ चमचा, हिरव्या मिरच्या - २ ते ३, नारळ - १ वाटी (किसलेले), कढीपत्ता, मोहरी - १/२ चमचा, हळद - १/४ चमचा, तेल - १ चमचा, मीठ चवीनुसार

★ **कृती :-** सर्वात आधी दही फेटून घ्या, बेसन गाळून घ्या आणि दह्यात मिसळा. आता बेसनाच्या मिश्रणात दोन कप पाणी, हळद, आले पेस्ट आणि मीठ घाला आणि मिक्स करा. बेसनाची पेस्ट नीट फेटून घ्या जेणेकरून मिश्रणात गुठळ्या होणार नाहीत. आता मध्यम आचेवर एक पॅन गरम करा आणि बेसनाचे मिश्रण पॅनमध्ये घाला, सतत ढवळत राहा, जोपर्यंत ते घट्ट होत नाही. गॅस बंद करा, एक मोठी प्लेट घ्या, त्यावर बेसनाचे मिश्रण घाला आणि ते समान रीतीने पसरवा. त्याचप्रमाणे, संपूर्ण बेसनाचे मिश्रण २ ते ३ ताटांवर पसरवा. हे मिश्रण थंड होण्यास १० ते १५ मिनिटे लागतात. दरम्यान, खांडवीसाठी टेम्परिंग तयार करा. आता कढईत तेल किंवा तूप गरम करा. तेल गरम झाल्यावर, मोहरी आणि कढीपत्ता घाला आणि हलके तळा. यानंतर, किसलेले नारळ टेम्परिंगमध्ये मिसळा आणि गॅस बंद करा. प्लेटवरील खांडवी स्प्रेडवर नारळ टेम्परिंग पसरवा. पुढे, प्लेटवर पसरलेले मिश्रण २ इंच रुंदीच्या पट्ट्यांमध्ये कापून घ्या. या पट्ट्या गोल आकारात घडी करा. आता कोथिंबीर आणि किसलेले नारळ गार्निश करून नक्कीच सर्व्ह करा.





# भारतीय महिला संघाने कबड्डी विश्वचषक जिंकला

## चायनीज तैपेईचा ३५-२८ ने धुव्वा उडवला

**भारतीय महिला संघाने सलग दुसरा कबड्डी विश्वचषक जिंकला. अंतिम सामन्यात भारताने चायनीज तैपेईचा ३५-२८ असा पराभव करून विश्वविजेतेपद पटकावले. संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या छत्तीसगडच्या रेडर संजू देवीला 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' म्हणून निवडण्यात आले. भारताने २०१२ मध्ये इराणचा पराभव करून पहिल्यांदा विश्वचषक जिंकला होता. विशेष म्हणजे, संघाने २०१२ आणि तब्बल १३ वर्षांनी झालेला यंदाच्या विश्वचषक हंगामात आपले सर्व १२ सामने जिंकले आहेत.**




■ ढाका

**ढाका** येथील शहीद सुहारावर्दी इनडोअर स्टेडियममध्ये झालेल्या सामन्यात टॉस चायनीज तैपेईने जिंकला आणि भारताला पहिल्या रेडची संधी मिळाली. संजू देवीने सुरुवातीच्या रेडमध्येच संघाला आघाडी मिळवून दिली. तैपेईने बोनस घेऊन प्रत्युत्तर दिले, पण पूनम आणि सोनालीच्या टॅकल्समुळे भारताची पकड आणखी मजबूत झाली. संजूने सुरुवातीच्या मिनिटांतच तीन गुणांची आणखी एक दमदार रेड केली. तैपेईच्या येन चियाओ-वेनने २ गुण घेऊन स्कोअर ७-७ असा बरोबरीत आणला.

त्यानंतर सुपर टॅकलमुळे तैपेई ९-७ ने पुढेही गेली. १२ व्या मिनिटात संजूने चार खेळाडूंना बाद करून सामन्याचे चित्र बदलले आणि भारताने १३-१२ अशी आघाडी घेतली. तैपेईच्या ह्वांग सुचिनने फरक कमी ठेवण्याचा प्रयत्न केला, पण संजूच्या २ गुणांच्या रेडमुळे आणि त्यानंतरच्या ऑलआऊटमुळे भारताला १७-१४ अशी आघाडी मिळवून दिली. हाफ टाइमपर्यंत भारत २०-१६ने पुढे होता. दुसऱ्या हाफची सुरुवात तैपेईने बोनस पॉइंटने केली, पण पुष्पाच्या तीन गुणांच्या रेडने भारताची आघाडी पुन्हा वाढवली. तैपेईने रेड आणि टॅकलने पुनरागमनाचा प्रयत्न केला आणि स्कोअर २५-२२ पर्यंत आणला, पण भारताच्या संतुलित रेडिंग आणि मजबूत डिफेन्सने त्यांना पुढे जाऊ दिले नाही.

शेवटच्या ४ मिनिटांत तैपेईने सुपर टॅकल करून फरक ३०-२६ पर्यंत नक्कीच कमी केला, भारताने पुन्हा सामन्यावर पकड मजबूत करत आणखी एकदा तैपेईला ऑलआउट केले. निर्धारित वेळेनंतर भारत ३५-२८ ने विजयी ठरला. २०२३ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अंतिम फेरीत संघाने २६-२५ ने विजय मिळवला होता. त्याच स्पर्धेतील गट सामन्यात दोन्ही संघ ३४-३४ने बरोबरीत राहिले होते.






**डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठअंतर्गत आयोजित आंतरमहाविद्यालय व्हॉलीबॉल स्पर्धेत मुलांच्या गटात डी.वाय.पाटील मेडिकल कॉलेज संघाने आणि मुलींच्या गटामध्ये डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी संघाने विजेतेपद पटकावत जल्लोष साजरा केला.**

## १,७५० पेक्षा जास्त स्कॉट्स मारून
## गणेश आखाड्याची कोमल विजेती

■ मुंबई

**मीरा**-भाईंदर येथील श्री गणेश आखाड्याची महिला पैलवान कोमल पटेलने गोरेगांव पूर्व येथील नेस्को, बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे आयएचएफएफने आयोजित केलेल्या इंटरनॅशनल हेल्थ, स्पोर्ट्स आणि फिटनेस फेस्टिव्हलमध्ये १,७५० पेक्षा जास्त स्कॉट्स मारून अव्वल क्रमांक मिळवला. प्युरिटेओ न्युट्रिटिओन कंपनीने विविध व्यायाम प्रकारात जे विजेते होतील त्यांना खास पारितोषिके दिली. विशेष म्हणजे कोमल पटेल ही एकमेव महिला स्पर्धक होती. तिने सर्व पुरुष स्पर्धकांना मागे टाकून जेतेपद पटकावले.

स्पर्धेला सुरुवात झाली तेव्हा सवय नसल्यामुळे बरेच स्पर्धक ५०० स्कॉट्स झाल्यानंतर बाहेर पडले. ११०० स्कॉट्स मारेपर्यंत शेवटी तिघेच जण या स्पर्धेत राहिले. कुस्ती प्रशिक्षक वैभव माने व सुशांत जाधव तिचे स्पर्धेदरम्यान सतत मनोबल उंचावत होते. कोमल गेली चार वर्षे कुस्तीचे धडे वस्ताद वसंतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेत आहे. नुकत्याच झालेल्या आंतर कॉलेज कुस्ती स्पर्धेत तिने सुवर्ण पदक जिंकून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेसाठी मुंबई विद्यापीठ संघात स्थान मिळवले आहे. ठाणे जिल्ह्यात ती अव्वल आहे. राष्ट्रीय आणि राज्य कराटे स्पर्धेत देखील कोमलने सुवर्ण पदक पटकावलेय. तिचे वडील रिक्षा चालक असून घरची आर्थिक परिस्थिती बेताचीच आहे. सध्या कोमल अभिनव कॉलेजात कला शाखेच्या पहिल्या वर्षाला आहे.

## भारत पराभवाच्या छायेत
## द. आफ्रिका ३१४ धावांच्या आघाडीवर

■ गुवाहाटी

**मार्को** यान्सेनच्या (६ गडी) भेदक गोलंदाजीसमोर भारतीय संघातील फलंदाजांनी सपशेल नांगी टाकल्यामुळे गुवाहाटी कसोटीमध्ये आज तिसऱ्या दिवशी भारतीय संघाचा पहिला डाव अवघ्या २०१ धावांत आटोपला. त्यानंतर दिवसअखेर दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या डावात बिनबाद २६ धावा केल्या. सध्या दक्षिण आफ्रिकेचा संघ ३१४ धावांच्या भक्कम आघाडीवर आहे. त्यामुळे भारतीय संघ पराभवाच्या छायेत आला आहे.

दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात ४८९ धावा केल्या. त्यानंतर के. एल. राहुल व यशस्वी जैस्वाल यांनी बिनबाद ९ धावांवर आज तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ६५ धावांची भागीदारी रचली. लोकेश राहुलच्या (२२) रुपात भारतीय संघाला पहिला धक्का बसला. दुसऱ्या बाजूला यशस्वी जैस्वालने अर्धशतक ५८ ठोकले. साई सुदर्शनने १५ धावा, कर्णधार ऋषभ पंतने ७ धावा, रवींद्र जडेजाने ६ धावा आणि नितीश रेड्डीने १० धावा केल्या. ९५ धावांवर एक विकेट बाद झाल्यानंतर भारताने १२२ धावांपर्यंत पोहोचण्यापूर्वी ७ विकेट गमावल्या. त्यानंतर सुंदरने कुलदीप यादवसोबत ७२ धावांची भागीदारी केली. सुंदरच्या बाद झाल्यामुळे संघाची धावसंख्या २०१ झाली.

**जाहीर सूचना**

येथे सूचना देण्यात येते की श्रीमती मारिया कार्लोटा सेसिलिया लीना फर्नांडिस यांनी गाव - दादर, जिल्हा - मुंबई येथे स्थित सर्व्हे क्र.२/३२ च्या जमिनीवर बांधकामित पर्ल कोहौसो लिमिटेडच्या ३ऱ्या मजल्यावरील ४२० चौ.फूट कार्पेट क्षेत्राच्या फ्लॅट क्र.ए-१४ बाबत अधिकार मिळवले होते., तथापि, श्रीमती मारिया कार्लोटा सेसिलिया लीना फर्नांडिस यांचे १८/११/२०१८ रोजी निधन झाले, त्यांच्या पश्चात त्यांचे एकमेव कायदेशीर वारस श्री. ट्रेवर थिओडोर फर्नांडिस, श्री. अर्नेस्ट जोसेफ फर्नांडिस, श्री. विल्यम स्टीफन फर्नांडिस, श्री. एम्मा सिनफारोस डिसिल्वा, श्री. स्टॅनिस्लॉस ऑगस्टीन फर्नांडिस आणि श्री. रेमंड कॅस्मिरो फर्नांडिस हे आहेत. पुढे, श्री. अर्नेस्ट जोसेफ फर्नांडिस, श्री. विल्यम स्टीफन फर्नांडिस, श्रीमती एम्मा सिनफारोस डिसिल्वा, श्री. स्टॅनिस्लॉस ऑगस्टीन फर्नांडिस आणि श्री. रेमंड कॅस्मिरो फर्नांडिस यांनी ०२.०५.२०२५ रोजी नोंदणी क्र.मुंबई-१०/७६०४/२०२५ च्या रिलीज डीडद्वारे श्री. ट्रेवर थिओडोर फर्नांडिस यांना त्या फ्लॅटच्या संदर्भात त्यांचा हिस्सा सोडला आहे. श्री. ट्रेवर फर्नांडिस यांनी सदर फ्लॅट माझे अशिल श्रीमती तेजश्री डीन डिसूझा आणि श्री.डीन डिसूझा यांना ०८.११.२०२५ रोजीचे विक्री करार नोंदणी क्र. मुंबई-११/२१०३३/२०२५ द्वारे विकला. कोणा व्यक्तिस सदर फ्लॅट किंवा त्याच्या कोणत्याही भागाबाबत विक्री, देवाणघेवाण, गहाणखत, शुल्क, भेटवस्तू, ट्रस्ट, वारसा, ताबा, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, नियुक्ती, हस्तांतरण, वहिवाट, उप-वहिवाट, मृत्युपत्र, उत्तराधिकार, परवाना, देखभाल, जबाबदारी, कर्ज, अग्रिम, धारणाधिकार, तारण, आदेश, कोणत्याही न्यायालयाने दिलेले किंवा जारी केलेले निर्णय किंवा हुकूम, कर किंवा महसूल किंवा वैधानिक अधिकारी, जोडणी, तडजोड किंवा अन्यथा कसेही याद्वारे कोणताही दावा असल्यास त्यांनी खालील स्वाक्षरीकर्त्यास बी/१०६, १ला मजला, सय्यद मंझिल कोहौसो लिमिटेड, पंडित दिनदयाल नगर, बसिन कॅथोलिक बँक लिमिटेड समोर, माणिकपूर, वसई (पश्चिम), जिल्हा पालघर - ४०१२०२ येथे या तारखेपासून १४ दिवसांच्या आत वैध कागदोपत्री पुराव्यांसह ते लेखी स्वरूपात कळवणे आवश्यक आहे, अन्यथा असे गृहीत धरले जाईल की कोणतेही दावे अस्तित्वात नाहीत आणि ते, जर असतील तर, माफ केलेले किंवा सोडून दिलेले मानले जातील.
वसई, आज दिनांकित २५ नोव्हेंबर २०२५.
सही/-
डेव्हिड एस. डाबरे
वकील उच्च न्यायालय, मुंबई

**जाहीर सूचना**

जनतेला सूचना देण्यात येत आहे की, आम्ही फ्लॅट क्र.१४०१ शुभम इमारतीत, बी-५२, आझाद नगर रोड क्र.३, वीरा देसाई रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५८ आणि आझाद नगर शुभम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडने जारी केलेल्या भाग प्रमाणपत्र क्र.०४४ अंतर्गत समाविष्ट असलेल्या शेअर्सच्या संदर्भात सुश्री श्रद्धा गौतमकुमार पटेल उर्फ श्रीमती श्रद्धा आर. दुमासिया यांच्या शिर्षकाची चौकशी करत आहोत आणि खालील अनुसूचीत विशेषतः वर्णन केले आहे.

कोणा व्यक्तिस सदर फ्लॅट किंवा त्याच्या कोणत्याही भागावर आणि/किंवा सदर शेअर्सवर विक्री, देवाणघेवाण, गहाणखत, शुल्क, भाडेपट्टा, धारणाधिकार देखभाल, ताबा, भेटवस्तू, ट्रस्ट, सुविधा किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही दावा असल्यास त्यांना विनंती आहे की त्यांनी या माहितीच्या प्रकाशनापासून चौदा (१४) दिवसांच्या आत अशा दाव्याच्या समर्थनार्थ कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रतींसह लेखी स्वरूपात आम्हाला त्याबद्दल कळवावे.

उपरोक्त कालावधीनंतर आणि/किंवा कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रतींशिवाय प्राप्त झालेला कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही आणि असा कोणताही दावा माफ करण्यात आला आहे असे मानले जाईल.

फ्लॅट क्र.१४०१, मोजमाप कार्पेट क्षेत्रफळ ९०२ चौ.फूट, १४व्या मजल्यावर, शुभम म्हणून ज्ञात इमारतीत, आझाद नगर शुभम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, सी.टी.एस. क्र.१८३ (भाग), सर्व्हे क्र.१३३, आंबिवली गाव, बी-५२, आझाद नगर रोड क्र.३, वीरा देसाई रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५८ आणि १० पूर्णपणे भरणा केलेले शेअर्स ज्यांचे प्रत्येकी ५०/- रुपये किमतीचे आणि ज्यांचे विशिष्ट क्र.४०१ ते ४१० (दोन्ही समाविष्ट) हे आझाद नगर शुभम को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडने जारी केलेल्या भाग प्रमाणपत्र क्र.०४४ मध्ये समाविष्ट आहेत.

सही/-
ए. डी. मेहता
एस. पाठक अँड कं., ॲडव्होकेट्स करिता
४०१, त्रिवेणी कृपा इमारत, ३रे कार्टर रोड, अंबे माता मंदिरासमोर, बोरिवली (पूर्व), मुंबई-४०००६६
दिनांक: २५.११.२०२५ ठिकाण: मुंबई

**मध्य रेल्वे**
**ब्रेक व्हॅन्सची श्रेणीवृद्धी**

कामाचे नावः कारखान्यामध्ये नियतकालिक दुरुस्तीदरम्यान ब्रेक व्हॅन्सची श्रेणीवृद्धी. **अंदाजित किंमतः** ₹३,३६,६१,७५२.००/-, **निविदा अर्जाची किंमत (रु.)** - शुन्य, **ईएमडी (रु)** : ₹३,७८,३००.००/-, **पूर्तता कालावधीः** ३६ महिने. वरील ई-निविदांच्या सादरीकरणाकरिता वेळ आणि दिनांक **११.१२.२०२५ रोजी १५.०० वा.पर्यंत.** ई-निविदेचे संपूर्ण तपशील अधिकृत रेल्वे वेबसाईट **http://www.ireps.gov.in** येथे उपलब्ध आहे. खुली निविदा सूचना क्र.: केडब्ल्यूव्ही-एमईसीएच-ब्रेक-व्हॅन-२५-२६ दि. १९.११.२०२५ 682

रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे दंडनीय गुन्हा आहे

**मध्य रेल्वे**
**शुद्धिपत्र क्र.१**

**निविदा क्र.सीआर-बीबी-टीईएलई-२०२५-४९**
निविदा क्र.सीआर-बीबी-टीईएलई-२०२५-४९ साठी **शुद्धिपत्र क्र.१** जारी करण्यात आला आहे **निविदा बंद होण्याची तारीख १७.१२.२०२५ रोजी १५:०० अशी सुधारित करण्यात आली आहे.** तपशील **www.ireps.gov.in** या वेबसाईटवर पाहता येतील उर्वरित इतर सर्व अटी आणि शर्ती तशाच राहतील. **ही निविदा जाहीर खरेदी धोरण आदेश २०१७/ दिनांक १५.०६.२०१७ चे पालन करते.**
684 डीआरएम (एस ॲण्ड टी) सीएसएमटी करिता

असुरक्षित तथा अनधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

**रिषी टेकटेक्स लिमिटेड**
**सीआयएन:** L28129MH1984PLC032008
६१२, वीणा किल्लेदार इंडस्ट्रीयल इस्टेट, १०-१४ पायस स्ट्रीट, भायखळा (पश्चिम), मुंबई - ४०० ०११.
**दूर. क्र.:** (०२२) २३०७५६७७ / २३०७४५८५, ; **फॅक्स क्र.:** (०२२) २३०८००२२,
**वेब.:** www.rishitechtex.com **ईमेल:** info@rishitechtex.com

**भौतिक समभाग हस्तांतरण विनंत्या पुन्हा दाखल करण्यासाठी विशेष खिडकी**

आमच्या ३१ जुलै २०२५ च्या वर्तमानपत्रातील जाहिरातीव्यतिरिक्त आणि चालू असलेल्या पत्रव्यवहाराचा एक भाग म्हणून, भागधारकांना पुन्हा एकदा कळविण्यात येते की, सेबी परिपत्रक क्र. सेबी/एचओ/एमआयआरएसडी/एमआयआरएसडी-पीओडी/पी/सीआयआर/२०२५/९७ दिनांक ०२ जुलै, २०२५ च्या अनुषंगाने, गुंतवणूकदारांना गुंतवणूक सुलभ करण्यासाठी आणि त्यांनी खरेदी केलेल्या सिक्युरिटीजमध्ये गुंतवणूकदारांचे हक्क सुरक्षित करण्यासाठी, भौतिक समभागांच्या हस्तांतरण विनंत्या पुन्हा दाखल करण्यास सुलभ करण्यासाठी दि. ७ जुलै २०२५ ते दि. ६ जानेवारी २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी विशेष खिडकी उघडण्यात आली आहे. आधी सांगितल्याप्रमाणे, ही सुविधा फक्त अशा हस्तांतरण करारांसाठी उपलब्ध आहे जे दि. १ एप्रिल २०१९ पूर्वी दाखल केले गेले होते परंतु कागदपत्रे/प्रक्रिया/किंवा अन्यथाच्या कमतरतेमुळे फेटाळण्यात/परत करण्यात/दखल घेण्यात आले नव्हते. या कालावधीत, हस्तांतरणासाठी पुन्हा दाखल केलेल्या प्रतिभूती (आजच्या दिनांकास कंपनी/आरटीए-ॲड्रॉईट कॉर्पोरेट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडकडे प्रलंबित असलेल्या विनंत्या समाविष्ट) फक्त डीमॅट पद्धतीने जारी केल्या जातील. अशा हस्तांतरण-सह-डीमॅट विनंत्यांसाठी योग्य प्रक्रिया अवलंबली जाईल. संबंधित परिपत्रक आणि विशेष खिडकीच्या संदर्भात प्रसिद्ध सूचनेची प्रत कंपनीची वेबसाईट म्हणजेच **www.rishitechtex.com** येथे उपलब्ध आहे.
पात्र भागधारकांना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट (आरटीए) शी संपर्क साधावा म्हणजेच ॲड्रॉइट कॉर्पोरेट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, १७/२०, जाफरभॉय इंडस्ट्रियल इस्टेट, पहिला मजला, मकवाना रोड, मरोळ नाका, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०५९, किंवा अधिक मदतीसाठी **investors@rishitechtex.com** वर कंपनीशी संपर्क साधावा. पात्र भागधारकांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या हस्तांतरण विनंत्या सर्व बाबतीत योग्यरित्या पूर्ण करून दि. ६ जानेवारी २०२६ या अंतिम तारखेपर्यंत सादर कराव्यात.

मंडळाच्या आदेशाद्वारे
**रिषी टेकटेक्स लिमिटेड**करिता
सही/-
**गौरी गांगल**
कंपनी सचिव

**दिनांक:** २४.११.२०२५
**ठिकाण:** मुंबई

**रामेश्वर मिडिया**